PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 2

# ई कॉमर्सचा वाढता वेग

**प्रा. डॉ. राजोळे बालाजी शिवाजी**
वाणिज्य विभाग
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय,
लोहारा ता.लोहारा जि.उस्मानाबाद
महाराष्ट्र भारत

**प्रस्तावना:**

आज जागतिक बाजार पेठे एक झाल्यामुळे ग्राहकाने पारंपारिक पध्दतीनुसार विक्रेत्याकडे जाऊन वस्तु खरेदी करणे ही पध्दत कालबाह्य होत चालली आहे.ग्राहक घरच्या घरी बसून वस्तू खरेदी करु शकतो आणि त्याही वस्तु घरपोच मिळतात त्याही अल्प कालावधीत रकमेचे शोधन देखील घरी बसूनच करीत असतो. त्यासाठी विक्रेत्याकडे ग्राहकांना विक्री केंद्रात जाण्याची गरज भासत नाही. अशा प्रकारची खरेदी संगणक किंवा मोबाईल आणि इंटरनेटच्या सहाय्याने वस्तु घरी बसल्या खरेदी करु शकतो. या वस्तु व सेवांच्या देवाण घेवाणीला ई—कॉमर्स असे म्हणतात.

**अर्थ आणि संकल्पना:**

इलेक्ट्रॉनिक कॉमर्सची (E-Commerce) संकल्पना गत ३० वर्षापासून बदलत गेली. भारतातील विपणन संदर्भातील व्यवहार करणे, कर्ज काढणे, आपली लेखापुस्तके तज्ञ व्यक्तीकडून तपासून घेणे, त्या संदर्भात त्यांचे प्रमाणपत्र मिळविणे वित्तीय बाबीबाबत सल्ला घेणे इत्यादी कामे केले जातात. साध्या आण सरळ भाषेत सांगायचे झाले तर ई कॉमर्स म्हणजे इलेक्ट्रानिक व्यापर होय. जो संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवर होत असतो.वस्तु आणि सेवा

यांची खरेदी आणि किंमतीचे शोधन यासारख्या वाणिज्य विषयक उलाढाली इंटरनेटवरुन करणे म्हणजे ई–कॉमर्स होय.

**ई–कॉमर्सचे उद्देश:**

१. ग्रामीण भागातील लोकांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे व रोजगार उपलब्ध करुन देणे.
२. आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रगती होत असते याकडे लोकांना आकर्षित करता येते.
३. कमीत कमी खर्चात समाजातील लोकांना जास्तीत जास्त फायदे व सोयी उपलब्ध करुन देता येते.
४. व्यवसायीक ध्येय साधण्यासाठी उद्योजकांना ई–कॉमर्सचा महत्वाचा वाटा असतो.
५. देशाच्या आर्थिक प्रगतीस मदत होते.

**ई–कॉमर्समुळे निर्माण होणा–या समस्या:**

१. ई कॉमर्ससाठी लागणारी साधने म्हणजे संगणक,मोडेम, टेलिफोन यासारख्या वस्तूसाठी करावा लागणा–या खर्चासाठी सर्वसाधारण भारतीय व्यक्तीमध्ये क्षमता नाही. यामुळे ई कॉमर्सचा वापर मर्यादित राहिला आहे.
२. ई कॉमर्समध्ये उपभोक्ते, व्यवसायिक यांना फायदे होत असले तरी ई कॉमर्सची सेवा किंवा दुरसंचार पध्दती देशातील सर्वच ठिकाणी उपलब्ध नाही.
३. ई कॉमर्समध्ये ग्राहकांने एखादी वस्तु खरेदी करताना ग्राहकांना ती वस्तु प्रत्यक्षात पाहता येत नाही.
४. ई कॉमर्सच्या व्यवहारात गुप्तता राखली जात नाही. त्यामुळे अनेक व्यक्तींना आपली वैयक्तीक माहितीचा दुरुपयोग केला जाईल अशी भिती वाटते.
५. ई कॉमर्सचे व्यवहार आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असतात. या व्यवहारातील आयात–निर्यात शुल्क ठरविणे व वसुल करणे ही बाब अतिशय अवघड आहे. त्यामुळे ई कॉमर्स व्यापारावर प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

**ई कॉमर्सच्या व्यवहाराबाबत शिफारसी:**

१. प्रथम ई कॉमर्सच्या बाबतीत ग्राहकांच्या मनात जी भिती ती दुर करणे गरजेचे आहे.
२. ई कॉमर्सला प्रगती करायची असेल तर प्रथम ग्रामीण व मागासलेल्या भागास विकसीत केले पाहिजे
३. ई कॉमर्स वर वस्तुची खरेदी करण्यासाठी प्रत्येकाला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.त्यासाठी सरकारने शालेय अभ्यासक्रमात संगणक विषय समावेश केला पाहिजे.
४. ई कॉमर्सच्या द्वारे खरेदी करणारे व्यवहार इतर देशाच्या तुलनेत भारताचे प्रमाण फारच कमी प्रमाणात आहे. त्याचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे.आजच्या युगामध्ये स्पर्धा करायची असेल तर आपणास ई कॉमर्स सारख्या व्यवहाराची संपुर्ण माहिती घेऊन इंटरनेटच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेत अगदी सहज प्रवेश मिळविता येतो.ग्राहकांना आपल्या आवडी निवडीनुसार व योग्य किंमतीत वस्तु खरेदी करता येते असल्यामुळे ग्राहकांची क्रय शक्ती वाढते.

वस्तुंची खरेदी विक्री करण्यासाठी ई कॉमर्स ही एक उपयुक्त सुविधा इंटरनेटवर उपलब्ध झाली आहे. या माध्यमाद्वारे ग्राहक जास्तीत जास्त वस्तु खरेदी करतात. यामुळे सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे. ग्राहकांना पाहिजे त्या वस्तु पाहिजे त्या ठिकाणी पाहिजे त्या दिवशी व व्यक्तीला पोहचविण्याची सोय ई कॉमर्समुळे उपलब्ध झाल्यामुळे कमी त्रासात व वेळेवर योग्य ती वस्तु योग्य त्या व्यक्तीला पोहचविल्या जावू शकते तसेच लोकांना कंटाळवाणे वाटणारे व्यवहार, लाईट बील भरणे वस्तूची विक्रेत्तर सेवा, रेल्वेचे तिकीट, सरकारी कामकाज ई कॉमर्समुळे सहज सोपे झाले आहे. इंटरनेटमुळे ग्राहकांना दिवसाच्या २४ तासामध्ये कधीही वस्तुंची खरेदी करता येते.

## संदर्भ ग्रंथ :

1- Agarwal Kamlesh N. and Agrwal Deeksha: Business in Net- Introduction to E- Commerce Macmillon India, New Delhi
2- Agarwal Kamlesh N. and Agrwal Deeksha: Bulls, Bears and the Mouse – An Introduction to Online Stock Market Trading; Macmillon India, New Delhi
3- www.atkearney.com
4- www.engt.ssju.edu.
5- www.google.com